# अस्थायी पदे रद्द

## प्रधानमंत्री व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतील १,३८४ जणांच्या नोकऱ्या संकटात

nitin.chavan
@timesgroup.com
@nitinchavanMT

मुंबई : लॉकडाउनमुळे खासगी व्यवसाय आणि कंपन्यांमधील कामगार, कर्मचाऱ्यांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली असताना आता सरकारी खात्यावरही लॉकडाउनचे परिणाम होऊ लागले आहेत. केंद्र सरकारची प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेत काम करणाऱ्या तब्बल १,३८४ अस्थायी (टेम्पररी) कामगार, कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देण्यास राज्य सरकारने नकार देत त्यांची पदे रद्द केली आहेत. त्यामुळे त्यांच्या नोकऱ्या धोक्यात आल्या आहेत.

केंद्र सरकारची प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेसाठी अंमलबजावणीसाठी राज्य पातळीवर पदे निर्माण करण्यात आली आहेत. एकूण रिक्त पदांपैकी १,३८४ पदे मागील काही वर्षांपासून अस्थायी (टेम्पररी) स्वरूपात भरण्यात आली आहेत. मुख्य अभियंता, अधीक्षक

### ग्राम विकास योजनेची वैशिष्ट्ये

- राज्यात ३० हजार किमीची रस्तेबांधणी
- त्यासाठी आशिया डेव्हलपमेंट बँकेचे ५,००० कोटींचे कर्ज
- आतापर्यंत २,१६० कोटींचे कर्ज घेतले आहे.

### आदेशात संदिग्धता

या पदांना वित्त विभागाने आधी ३१ ऑगस्टपर्यंत आणि नंतर ३१ मेपर्यंत मुदतवाढीचे आदेश काढले आहेत. त्यामुळे संदिग्धता निर्माण झाली आहे. याबाबत अभिप्राय देण्याची विनंती वित्त विभागाला करण्यात आली आहे, असे ग्रामविकास विभागाचे उपसचिव ए. का. गागरे यांनी प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात म्हटले आहे. वित्त विभागाचा अभिप्राय येईपर्यंत ही मुदतवाढ ३१ मेपर्यंतच आहे, असे समजण्यात येईल, असे ग्रामीण रस्ते विकास संस्था विभागाला कळवण्यात आले आहे, असेही स्पष्ट केले आहे.



अभियंता, कार्यकारी अभियंता, उप अभियंता, राज्य गुणवत्ता समन्वयक, वित्तीय नियंत्रक, लेखाधिकारी, आयटी नोडल अधिकारी, शाखा व कनिष्ठ अभियंता, लघुलेखक (निम्न व उच्च श्रेणी), स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, लिपिक, वरिष्ठ लिपिक, वाहनचालक व शिपाई या पदांचा त्यामध्ये समावेश आहे.

या पदांना राज्याच्या ग्रामविकास विभागाने ३१ ऑगस्ट, २०२०पर्यंत मुदतवाढ दिली होती. मात्र वित्त विभागाने ३१ मार्च, २०२०च्या शासन निर्णयाप्रमाणे सर्व अस्थायी पदे फेब्रुवारीत संपुष्टात आल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच वित्त विभागाचे पुढील कोणतेही आदेश नसल्याने ही पदे ३१ मे रोजी रद्द करण्यात आली आहेत. मेनंतर कुठल्याही पदाचे वेतन काढले जाणार नाही, असे पत्रक ग्राम विकास विभागाने ५ जून रोजी प्रसिद्ध केले आहे.

या निर्णयाला कामगार संघटनांनी विरोध केला आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता मध्येच ही पदे रद्द करण्यात आल्याने कर्मचाऱ्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या कामावरही याचा परिणाम होणार आहे. ग्रामीण भागात योजनेची कामे रखडणार आहेत, असे कास्ट्राईब जिल्हा परिषद कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. सोहन चवरे यांनी सांगितले. योजना आणि कर्मचाऱ्यांचे रोजगार लक्षात घेता पूर्वलक्ष्यी प्रभावाने सर्वांना पुन्हा कामावर घ्यावे, अशी मागणी संघटनेने राज्य सरकारकडे केली आहे

## बनावट निर्जंतुकाचा साठा जप्त

मुंबई : बनावट सॅनिटायझर तयार करून त्याची जास्त किंमतीत विक्री करणाऱ्या दोघांना गुन्हे शाखेने शुक्रवारी बोरिवलीतून अटक केली आहे. गुन्हे शाखेच्या युनिट १०च्या पथकाने अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या सहाय्याने कारवाई करून सुमारे ३ लाख रुपयांचा साठा जप्त केला आहे.

बोरिवलीतील एस. व्ही. रोडवरील पटेलवाडीत दोन व्यक्ती बनावट सॅनिटायझर, निर्जंतुकीकरणाच्या रसायनाची विक्री करत असल्याची माहिती सहाय्यक पोलिस निरीक्षक वाहीद पठाण यांना मिळाली. त्यानुसार, युनिट १० च्या पथकाने ५ जून रोजी रात्री अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या सहाय्याने कारवाई केली. त्या साठविलेल्या द्रावणासाठी आरोपींकडे कोणतेही परवाना नव्हता. युनिट १० चे वाहीद यांच्यासह प्रभारी पोलिस निरीक्षक नामदेव शिंदे, हनुमंत डोपेवाड, धनराज चौधरी, अफरोज शेख आदींच्या पथकाने ही कारवाई केली. हिमांशु मेहता (४७), रितेश जबबदारी (४२) अशी संशयितांची नावे आहेत.

हा साठा तयार करण्यासाठी त्या दोघांनी बीकेसी/क्वार्टनरी अमोनियम कंपाउंड, पाणी, नैसर्गिक सुगंधी द्रव्ये मिसळण्याची पद्धत अवलंबली होती.

# ट्विट केले तरच करोना अहवाल!

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

शहरातील करोना नियंत्रक यंत्रणा योग्यप्रकारे काम करत आहे, असे राज्य सरकार आणि महापालिकेकडून सांगण्यात येत आहे. प्रत्यक्षात सर्वसामान्यांना चाचणीचे अहवाल मिळवण्यासाठीही वारंवार रुग्णालयात हेलपाटे घालावे लागत आहेत. अगदी या संकटकाळात प्राणाची बाजी लावणाऱ्या पोलिसांनाही चाचणी अहवालासाठी आठवडाभर प्रतीक्षा करावी लागत आहे. यासंदर्भात पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांना ट्विट करताच मात्र काही तासांतच अहवाल उपलब्ध झाल्याचा अनुभव नुकताच आला. त्यामुळे सगळ्यांनीच अहवालासाठी ट्विट करावे, का असा प्रश्न संबंधिताचे कुटुंबीय विचारत आहेत.

अंधेरी पोलिस स्टेशनमधील एका पोलिस अधिकाऱ्यास २६ मे रोजी ताप, थंडीचा त्रास जाणवू लागला. सुरुवातीला स्थानिक दवाखान्यात उपचार घेतले. मात्र ताप कायम असल्याने त्यांनी पोलिस आयुक्तालयाकडून पत्र घेऊन जोगेश्वरीतील बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा रुग्णालयात करोना चाचणी केली. आठ दिवसानंतरही अहवाल मिळत नसल्याने ३ जूनला खासगी रुग्णालयात करोना

### आठवडाभर प्रतीक्षा करूनही निराशा

#### चाचणी नाही

ट्रॉमा रुग्णालयात करोना चाचणी केली जात नाही. करोना संशयितांचे स्वॅब एकत्र करून ते लॅबमध्ये पाठवण्यात येतात. महापालिकेने निश्चित केलेल्या लॅबमध्ये खासगी लॅबचा समावेश आहे. शिवाय त्या लॅबमध्ये अन्य रुग्णालयांचेही स्वॅब तपासणीसाठी येतात, असे ट्रॉमा रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक डॉ. विद्या माने यांनी सांगितले.



चाचणी केली.

३ जूनला रात्री ११ वाजता माऊली फाऊंडेशनच्या पूजा वालावलकर-नाईक यांनी हे प्रकरण ट्विट करून आदित्य ठाकरे यांना टॅग केले. ठाकरे यांनी प्रतिसाद दिल्यानंतर ४ जूनला सकाळी १० वाजता त्यांचा अहवाल मिळाला, असे पोलिस अधिकाऱ्याचा मुलगा नितीन शिंदे याने सांगितले.

'करोना चाचणीसाठी आम्ही ट्रॉमा रुग्णालयात अनेकदा चकरा घातल्या. नेहमी उद्या या, असे सांगितले जात होते. अहवाल मिळत नसल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करायला कोणीच तयार नव्हते. सरकारी आणि खासगी रुग्णालयात हीच स्थिती आहे. त्यांचे बरेवाईट झाले असते तर त्याची जबाबदारी कोणी घेतली असती?, असा सवाल शिंदे कुटुंबियांनी उपस्थित केला आहे.महापालिकेच्या ट्रॉमा रुग्णालयात २५-२६ मे पासून अनेकांनी करोना चाचणी केली. मात्र अद्याप त्यांचे अहवाल देण्यात आलेले नाहीत. अनेकदा पॉझिटिव्ह असल्याचे उशीराने समजल्यामुळे त्यांचा संसर्ग त्यांच्या सहवासातील इतरांना होतो. आदित्य ठाकरे यांना ट्विट केल्यानंतर एका रात्रीत अहवाल मिळाला. यामुळे आदित्य ठाकरे यांच्या ट्विटनंतरच कामे होणार का? जे नागरिक ट्विटर वापरत नाहीत त्यांना अहवाल मिळणारच नाही का? असा प्रश्न माऊली फाऊंडेशनच्या पूजा वालावलकर-नाईक यंत्रणेला विचारले आहेत.

# विमान तिकीट परतावा लढ्याला जागतिक यश

म.टा. प्रतिनिधी, मुंबई

करोना लॉकडाउनमुळे रद्द झालेल्या विमानांच्या तिकीटांचा परतावा देण्यास टाळाटाळ करणाऱ्या विमानसेवा कंपन्यांना संयुक्त राष्ट्रस्तरावरून चपराक बसली आहे. 'सर्व कंपन्यांनी प्रवाशांचा पूर्ण पैसे परत मिळण्याचा अधिकार कायम राखावा व याकडे त्या-त्या देशांमधील नागरी हवाई वाहतूक विभागाने लक्ष द्यावे', अशा स्पष्ट सूचना संयुक्त राष्ट्रांच्या व्यापार व विकास परिषदेने ग्राहक संरक्षण मार्गदर्शक तत्त्वांतर्गत जारी केली आहे. मुख्य म्हणजे, यासंबंधीचे निर्देश जारी करताना संयुक्त राष्ट्रांनी मुंबई ग्राहक पंचायतच्या लढ्याचा उल्लेख केला आहे.

लॉकडाउनमुळे २४ मार्चपासून विमानसेवा ठप्प आहे. थेट २५ मे रोजी मर्यादित स्वरूपात विमानसेवा सुरू झाली. परंतु एप्रिल ते जून हा पर्यटनाचा काळ असल्याने अनेकांनी आगाऊ तिकीट बुकींग केले होते. पण विमानसेवाच नसल्याने ती तिकीटे आपोआप रद्द झाली. या रद्द तिकीटांचे पैसे परत करण्याऐवजी कंपन्यांनी पुढील सहा महिन्यांच्या काळातील प्रवासासाठी 'क्रेडिट नोट' दिली. याविरोधात मुंबई ग्राहक पंचायतने लढा सुरू केला होता. नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयाला (डीजीसीए) पत्र लिहिले होते. तसेच यासंबंधी ऑनलाइन सर्वेक्षणही केले होते. या सर्व लढ्याला आता जागतिक स्तरावर यश आले आहे.

### संयुक्त राष्ट्रांच्या निर्देशात मुंबई ग्राहक पंचायतीचाही उल्लेख

#### 'पैसे परत मिळावेत'

मुंबई ग्राहक पंचायतचे कार्याध्यक्ष अॅड. शिरीष देशपांडे यांनी सांगितले की, 'करोना काळात विमानसेवा रद्द झाल्याने तिकिटे रद्द झाली. ही तिकिटे प्रवाशांनी स्वतःहून रद्द केलेली नाहीत. त्यामुळे पूर्ण पैसे परत मिळवणे हा त्यांचा अधिकार आहेच. संयुक्त राष्ट्रांच्याच अभ्यासानुसार जगभरातील या रक्कमेचा आकडा ३,५०० कोटी डॉलर इतका प्रचंड आहे. पण तेवढी रक्कम विमानसेवा कंपन्या परत करण्यास तयार नाहीत, हे यावरून स्पष्ट होत आहे. आता संयुक्त राष्ट्रांच्या सूचनेनंतरही तरी प्रवाशांना हा परतावा मिळणे आवश्यक आहे.'

## 'आयएनएस आंग्रे' तळ करोनामुक्त

मुंबई : नौदलाच्या कुलाबा परिसरातील 'आयएनएस आंग्रे' मधील करोनाला हद्दपार करण्यात यश आले आहे.

कुलाबा परिसरातील नौदल पश्चिम कमांड मुख्यालयात 'आयएनएस आंग्रे' हा तळ आहे. नौका दुरुस्तीसाठी आवश्यक असलेल्या सेवा या तळाद्वारे दिल्या जातात. मागच्या महिन्यात या तळावर एका नौसैनिकाला करोनाची लागण झाली. त्यानंतर त्याच्या प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संपर्कात आलेल्यांची तपासणी केली असता सुमारे ३२ ते ३५ सैनिक लक्षणविरहित करोना पॉझिटिव्ह निघाले. त्यानंतर हा तळ प्रतिबंधित करून करोनाला हद्दपार केले.

याबाबत संरक्षण जनसंपर्क अधिकारी कमांडर मेहुल कर्णिक यांनी सांगितले की, 'आयएनएस आंग्रे हे आम्ही पूर्ण बंद केले होते. तेथे राहणाऱ्यांचा बाहेरच्यांशी संपर्क पूर्णपणे बंद केला होता. रुग्णांचा संपर्क आलेल्या प्रत्येकाचा शोध घेतला. आयएनएस आंग्रे तळाचे वारंवार निर्जंतुकीकरण करण्यात आले. काही झाले तरी संक्रमण तेथून बाहेर पसरू नये, याची अत्यंत कठोर अशी खबरदारी बाळगण्यात आली. यामुळेच नियंत्रण मिळवू शकलो.'

आयएनएस आंग्रे हा तळ जवळपास करोनामुक्त झाला आहे. केवळ हा तळच नाही तर, आजुबाजूच्या परिसरातही करोनाचा रुग्ण नाही.

# आजी सापडल्या पण शवागृहात...

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

दोन दिवसांपूर्वी वादळाची शक्यता लक्षात घेऊन बीकेसी येथून रूग्णांना इतर रुग्णालयांमध्ये हलवण्यात आले. यात कांदिवलीतील एका आजीचांही समावेश होता. मात्र त्यांना नेमके कुठे नेले याची माहिती त्यांच्या कुटुंबाला दिलीच नाही. दोन दिवसांच्या अथक शोधानंतर पोलिसांनी बेवारस म्हणून ताब्यात घेतलेला आजीचा मृतदेह पाहण्याची वेळ कुटुंबीयांवर आली.

२ जून रोजी रात्री एक वाजता कांदिवली येथे राहणाऱ्या ६२ वर्षीय गायत्रीदेवी विश्वकर्मा यांना श्वास घ्यायला त्रास होऊ लागला. त्यांना शताब्दी रूग्णालयात नेण्यात आले. त्यावेळी त्यांच्या शरीरातील ऑक्सिजनची पातळी ३५ इतकी होती. तिथून त्यांना इतरत्र हलवण्यासाठी सांगण्यात आले. सकाळी साडेपाच वाजता बीकेसीत आणले. तिथे त्यांना ऑक्सिजन दिले मात्र आयसीयूची गरज असल्याने त्यांना इतरत्र न्या, असे सांगण्यात आले.

### माहिती कुटुंबाला दिलीच नाही

दरम्यान निसर्ग वादळामुळे बीकेसीमधील रुग्णांना हलवण्याचा निर्णय पालिकेने घेतला. मात्र त्यासंदर्भात नातेवाईकांना कोणतीही माहिती देण्यात आली नाही, असा आक्षेप गायत्रीदेवी यांचे नातू संदीप शर्मा यांनी 'मटा'कडे नोंदवला. वरळी येथे एनएससीआयला आजीला नेल्याचे त्यांना डॉक्टरांनी सांगितल्या क्षणी त्यांनी तिथे धाव घेतली. मात्र आजी तिथे नव्हत्या. दिवसभर शोधाशोध करूनही आजींचा ठावठिकाणा समजू शकला नाही.

४ जून रोजी शर्मा यांना लो. टिळक रुग्णालयामध्ये आजीला नेण्यात आल्याचे सांगितले. तेथील करोना कक्ष शोधल्यानंतर तिथेही त्या सापडल्या नाहीत. त्यादिवशी रात्री शवागारामध्ये जाऊन पाहा, असा निरोप त्यांना मिळाला. त्यावेळी आजीचा मृतदेह 'ओळख न पटल्याने' पोलिसांकडे सुपूर्द करत असल्याचे त्यांना समजले. आणखी थोडा जरी उशीर झाला असता तर आपल्या आजीवर अंत्यसंस्कारही झाले असते, अशा शब्दांत आपला उद्वेग गायत्रीदेवी यांच्या कुटुंबाने 'मटा'जवळ व्यक्त केला.

#### कागदपत्रे गहाळ

लो. टिळक रुग्णालायचे अधिष्ठाता व पालिका रूग्णालयांचे संचालक डॉ. रमेश भारमल यांच्याकडे याबाबत विचारणा केली असता त्यांनी, बीकेसीहून आलेल्या या महिला रुग्णाकडे कागदपत्रे नव्हती. त्यामुळे संपर्क क्रमांक वा इतर कोणतीही माहिती मिळाली नाही. त्यांची प्रकृती खालावली होती. त्यांना वाचवण्याचे शर्थीचे प्रयत्न डॉक्टरांनी केले. मृत्यू झाल्यानंतर संपर्काची माहिती उपलब्ध नसल्यामुळे पोलिसांना कळवले.

This addendum to the Letter of Offer ("**Addendum**") in India is for information purposes only and does not constitute an offer or an invitation or a recommendation to purchase, to hold, to subscribe or sell either entitlements or securities. All capitalized terms used herein and not defined herein shall have the meaning assigned to them in the letter of offer dated May 15, 2020 read with addenda dated May 18, 2020, May 19, 2020, May 22, 2020 and June 5, 2020 (the "**Letter of Offer**") filed with the stock exchanges, namely BSE Limited ("**BSE**") and National Stock Exchange of India Limited ("**NSE**" and together with BSE, "**Stock Exchanges**") and the Securities and Exchange Board of India ("**SEBI**").

## Reliance Industries Limited

Our Company was originally incorporated as "Mynylon Limited" in the State of Karnataka as a public limited company, under the Companies Act, 1956, pursuant to a certificate of incorporation dated May 8, 1973 issued by the Registrar of Companies, Karnataka, at Bangalore. Thereafter our Company obtained a certificate of commencement of business on January 28, 1976. Subsequently, the name of our Company was changed to "Reliance Textile Industries Limited" and a fresh certificate of incorporation consequent on change of name dated March 11, 1977, was issued by the Registrar of Companies, Karnataka, at Bangalore. The name of our Company was further changed to "Reliance Industries Limited" and a fresh certificate of incorporation consequent on change of name dated June 27, 1985 was issued by the Registrar of Companies, Maharashtra, at Mumbai. For details of changes in our name and address of our registered office, see "History and Corporate Structure" on page 121 of the Letter of Offer.

**Registered and Corporate Office**: 3rd Floor, Maker Chambers IV, 222, Nariman Point, Mumbai 400 021
**Telephone**: +91 (22) 3555 5000; **Facsimile**: +91 (22) 2204 2268
**Contact Persons**: Shri K. Sethuraman, Group Company Secretary and Chief Compliance Officer, and Smt. Savithri Parekh, Joint Company Secretary and Compliance Officer
**E-mail**: investor.relations@ril.com • **Website**: www.ril.com • **Corporate Identity Number**: L17110MH1973PLC019786

**PROMOTER OF OUR COMPANY: SHRI MUKESH D. AMBANI**

**ISSUE OF 42,26,26,894 PARTLY PAID-UP EQUITY SHARES OF FACE VALUE OF ₹ 10 EACH ("RIGHTS EQUITY SHARES") OF OUR COMPANY FOR CASH AT A PRICE OF ₹ 1,257 PER RIGHTS EQUITY SHARE (INCLUDING A PREMIUM OF ₹ 1,247 PER RIGHTS EQUITY SHARE) AGGREGATING TO ₹ 5,31,24,20,05,758 ON A RIGHTS BASIS TO THE ELIGIBLE EQUITY SHAREHOLDERS OF OUR COMPANY IN THE RATIO OF 1 (ONE) RIGHTS EQUITY SHARE FOR EVERY 15 FULLY PAID-UP EQUITY SHARES HELD BY THE ELIGIBLE EQUITY SHAREHOLDERS OF OUR COMPANY ON THE RECORD DATE, THAT IS, ON MAY 14, 2020 (THE "ISSUE"). FOR DETAILS, SEE "TERMS OF THE ISSUE" ON PAGE 272 OF THE LETTER OF OFFER.**

**ADDENDUM TO THE LETTER OF OFFER**

This Addendum is being issued pursuant to item (4) of Schedule IX of the Securities and Exchange Board of India (Issue of Capital and Disclosure Requirements) Regulations, 2018, as amended ("**SEBI ICDR Regulations**"). Our Company has filed the Letter of Offer with the Stock Exchanges and SEBI.

**NOTICE TO THE ELIGIBLE EQUITY SHAREHOLDERS OF THE COMPANY**

**Eligible Equity Shareholders are requested to please note the following:**

On June 5, 2020, our Company announced that Silver Lake and its co-investors will invest ₹ 4,546.80 crore, in addition to investment of ₹ 5,655.75 crore by Silver Lake announced on May 4, 2020, into our subsidiary, Jio Platforms Limited ("**JPL**"). This investment brings the aggregate investment by Silver Lake and its co-investors to ₹ 10,202.55 crore. Further, this investment by Silver Lake values JPL at an equity value of ₹ 4.91 lakh crore and an enterprise value of ₹ 5.16 lakh crore. The aggregate investment by Silver Lake and its co-investors will translate into a 2.08% equity stake into JPL on a fully diluted basis. The transaction is subject to regulatory and other customary approvals.

Accordingly, the Letter of Offer (including section titled "*Material Developments*" on page 245 of the Letter of Offer) shall stand amended to the extent stated hereinabove. This Addendum should be read in conjunction with the Letter of Offer, the Abridged Letter of Offer, the Application Form and the Rights Entitlement Letter. This Addendum shall be communicated to SEBI and the Stock Exchanges. Further, this Addendum can be accessed on websites of:

(i) our Company at www.ril.com;
(ii) the Registrar/ Registrar's web-based application platform at https://rights.kfintech.com; and
(iii) the Global Co-ordinators and Lead Managers and the Lead Managers.

Investors should only rely on the information included in this Addendum, the Letter of Offer, the Abridged Letter of Offer, the Application Form and the Rights Entitlement Letter.

For **RELIANCE INDUSTRIES LIMITED**
Sd/
**K. Sethuraman**
Group Company Secretary and Chief Compliance Officer
Place: Mumbai
Date: June 6, 2020

For **RELIANCE INDUSTRIES LIMITED**
Sd/
**Savithri Parekh**
Joint Company Secretary and Compliance Officer
Place: Mumbai
Date: June 6, 2020

**RELIANCE INDUSTRIES LIMITED** is proposing, subject to market conditions and other considerations, a rights issue of its Rights Equity Shares and has in this regard filed a Letter of Offer dated May 15, 2020 with SEBI and the Stock Exchanges. The Letter of Offer is available on the website of SEBI at www.sebi.gov.in, the Stock Exchanges, i.e., BSE Limited at www.bseindia.com, National Stock Exchange of India Limited at www.nseindia.com, Registrar's web-based application platform at https://rights.kfintech.com and on the websites of the Global Co-ordinators and Lead Managers, JM Financial Limited and Kotak Mahindra Capital Company Limited at www.jmfl.com and http://www.investmentbank.kotak.com, respectively, and on the websites of the Lead Managers, Axis Capital Limited, BNP Paribas, Citigroup Global Markets India Private Limited, DSP Merrill Lynch Limited, Goldman Sachs (India) Securities Private Limited, HDFC Bank Limited, HSBC Securities and Capital Markets (India) Private Limited, ICICI Securities Limited, IDFC Securities Limited, J.P. Morgan India Private Limited, Morgan Stanley India Company Private Limited and SBI Capital Markets Limited at http://www.axiscapital.co.in, http://www.bnpparibas.co.in, http://www.mlindia.com, http://www.online.citibank.co.in/rhtm/citigroupglobalscreen1.htm, www.goldmansachs.com,www.hdfcbank.com, https://www.business.hsbc.co.in/en-gb/in/generic/ipo-open-offer-and-buyback, http://www.icicisecurities.com, http://www.idfc.com/capital/index.htm, http://www.jpmipl.com, http://www.morganstanley.com/about-us/global-offices/asia-pacific/india and http://www.sbicaps.com, respectively. Investors should note that investment in equity shares involves a degree of risk and are requested to refer to the section titled "Risk Factors" on page 23 of the Letter of Offer for details of the same.

THE RIGHTS ENTITLEMENTS AND THE RIGHTS EQUITY SHARES HAVE NOT BEEN AND WILL NOT BE REGISTERED UNDER THE US SECURITIES ACT, OR ANY U.S. STATE SECURITIES LAWS AND MAY NOT BE OFFERED, SOLD, RESOLD OR OTHERWISE TRANSFERRED WITHIN THE UNITED STATES, EXCEPT IN A TRANSACTION EXEMPT FROM THE REGISTRATION REQUIREMENTS OF THE US SECURITIES ACT. THE RIGHTS EQUITY SHARES REFERRED TO IN THIS ADDENDUM AND THE LETTER OF OFFER ARE BEING OFFERED AND SOLD (I) IN OFFSHORE TRANSACTIONS OUTSIDE THE UNITED STATES IN COMPLIANCE WITH REGULATION S UNDER THE US SECURITIES ACT TO EXISTING SHAREHOLDERS LOCATED IN JURISDICTIONS WHERE SUCH OFFER AND SALE OF THE RIGHTS EQUITY SHARES IS PERMITTED UNDER LAWS OF SUCH JURISDICTIONS AND (II) IN THE UNITED STATES TO U.S. QIBs PURSUANT TO SECTION 4(A)(2) OF THE US SECURITIES ACT AND OTHER EXEMPTIONS FROM THE REGISTRATION REQUIREMENTS OF THE US SECURITIES ACT. THE OFFERING TO WHICH THIS ADDENDUM AND THE LETTER OF OFFER RELATE IS NOT, AND UNDER NO CIRCUMSTANCES IS TO BE CONSTRUED AS, AN OFFERING OF ANY RIGHTS EQUITY SHARES OR RIGHTS ENTITLEMENTS FOR SALE IN THE UNITED STATES OR AS A SOLICITATION THEREIN OF AN OFFER TO BUY ANY OF THE SAID SECURITIES, EXCEPT IN EACH CASE TO PERSONS IN THE UNITED STATES WHO ARE U.S. QIBs. ACCORDINGLY, YOU SHOULD NOT FORWARD OR TRANSMIT THIS ADDENDUM OR LETTER OF OFFER IN OR INTO THE UNITED STATES AT ANY TIME (OTHER THAN TO U.S. QIBs).

All offers and sales in the United States of the Rights Entitlements and the Rights Equity Shares have been, or will be, made solely by our Company. The Global Co-ordinators and Lead Managers and the Lead Managers are not making, and will not make, and will not participate or otherwise be involved in any offers or sales of the Rights Entitlements, the Rights Equity Shares or any other security with respect to this Issue in the United States.

